# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 27/04/2011 (का.प.क्र.17) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 27/04/2011 (का.प.क्र.17) रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 10.35 वा. वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से., नगरसचिव तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.विकास रतनलाल जैन
05. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
06. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
07. स. सौ.साधना गणेश सुरडकर
08. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
09. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
10. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
11. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
12. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
13. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

विषय क्र. 246 :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (3) व 20 (4) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठ्या टाकुन (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे संबंधी.

नगर सचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (3) व 20 (4) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठ्या टाकुन (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे संबंधी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (2) अन्वये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकानंतर दिनांक 20/5/2010 रोजी झालेल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी 16 सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणुन नेमणुक केलेली आहे.

पोट कलम 3 अन्वये स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम 2 मध्ये उल्लेख केलेले महानगरपालिकेची सभा ज्या महिन्यात भरेल, त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील. स्थायी समिती सदस्य निवडीची महानगरपालिकेची सभा दिनांक 20/5/2010 रोजी संपन्न झाली होती. त्यामुळे दिनांक 1/5/2011 रोजी मध्यान्हानंतर निम्मे सदस्य निवृत्त

होतील. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 चे पोट कलम (4) मधील तरतुदीप्रमाणे पोट कलम (2) अन्वये निवडणुक झाल्यानंतर 1 वर्षाने पोट कलम (3) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील, ते पोट कलम (3) मध्ये निम्ननिर्दीष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी मा.स्थायी समितीचे सभापती ठरवतील, अशावेळी व अशा रितीने चिठ्ठ्या टाकुन ठरविण्यात येईल आणि त्यांनतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळापर्यंत असतील,ते निवृत्त होतील.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक औमपा- 2010/883/प्र.क्र.140/नवि-24 मंत्रालय, मुंबई दिनांक 25/04/2011 अन्वये संयुक्त लोकशाही आघाडीचे पालिका सदस्य श्री.प्रमोद राठोड यांनी स्थायी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे, रिक्त होणाऱ्या पदावर औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिनांक 17/08/2010 रोजीच्या विशेष सभेतील विषय क्रमांक 63 नुसार राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सदस्य श्री.कैलास गायकवाड यांची केलेली नामनिर्देशनाची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 451 (3) नुसार विखंडीत करण्यात आली असल्याने, आता हे पद रिक्त झालेले आहे.

विद्यमान 15 स्थायी समिती सदस्यांच्या नावाची आणि वरीलप्रमाणे शासनाने स्थायी समिती सदस्य पदावर केलेली नामनिर्देशनाची कार्यवाही विखंडीत केल्याने एका चिठ्ठीवर रिक्त अशी नोंद केली जाईल. याप्रमाणे 16 स्वतंत्र चिठ्ठ्या तयार करण्यांत आलेल्या आहेत. या 16 चिठ्ठ्या स्वतंत्र पारदर्शक बरणीत टाकण्यांत येतील. व त्यातुन एक-एक चिठ्ठी काढुन अशा ज्या आठ चिठ्ठ्या ज्यांच्या नावाच्या निघतील ते सदस्य निवृत्त होतील.

स्थायी समितीचे 8 सदस्य निवृत्त होण्यासाठी वर दर्शविल्याप्रमाणे 16 स्वतंत्र चिठ्ठ्या मा.सभापती बरणी टाकतील. चिठ्ठ्या टाकतांना त्या सर्वांना दाखविण्यात येतील व बंद पाकीटात टाकुन त्याला एकाच रंगाचे रबर बँड लावुन त्या सर्वांसमक्ष बरणीत टाकण्यात येतील आणि सरमिसळ करून एक-एक अशा आठ नांवाच्या चिठ्ठ्या काढण्यात येतील. ज्यांचे नांवाची चिठ्ठी निघेल तो स.सदस्य निवृत्त होईल, असे समजण्यात येईल.

(यावेळी नगरसचिव हे 16 स्वतंत्र चिठ्ठ्या मा.सभापती यांचेकडे देतात व मा.सभापती या चिठ्ठ्यावरील नांवे वाचुन दाखवितात व नावाच्या चिठ्ठ्या सर्वांना दाखवितात.)

नगर सचिव : 15 सन्माननीय सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या आणि 1 रिक्त अशी नोंद केलेली चिठ्ठी अशा एकुण 16 चिठ्ठ्या करण्यात आलेल्या असून मा.सभापती यांनी नांवे वाचुन दाखवली व नांवे असलेल्या चिठ्ठ्या

सभागृहात दाखवल्या आहेत. याबद्दल कुणाचा काही आक्षेप असेल तर तसे सुचवावे. आतापर्यंत एकाही स.सदस्यांनी आक्षेप घेतलेला नाही.

मा.सभापती चिठ्ठ्या असलेल्या पाकीटांची गुंडाळी करून एकाच रंगाचे रबर बँड लावण्यात आल्याचे सभागृहास दाखवतील. यानंतर 16 चिठ्ठ्या असल्याबाबत एक-एक मोजणी करून सर्वांसमक्ष पारदर्शक बरणीत टाकतील. बरणीत 16 चिठ्ठ्या टाकुन बरणी बंद करून सर्वांना दाखविण्यात येतील. चिठ्ठ्यांची सरमिसळ करण्यात येईल. नंतर या पारदर्शक बरणीतील 16 चिठ्ठ्या दुसऱ्या एका कपडा लावलेल्या बंद बरणीत टाकुन त्यास हलवुन पुन्हा सरमिसळ करण्यांत येईल.

(यावेळी आतापर्यंत झालेल्या कामकाजा विषयी कुणाचा आक्षेप आहेत का विचारणा केली जाते. कुणाचाही आक्षेप नसतो.)

नगरसचिव : या चिठ्ठ्या कपडा बांधलेल्या रिकाम्या बरणीत टाकण्यात येतील त्यानंतर सरमिसळ करून मा.सभापती एक-एक चिठ्ठी काढतील, ज्या ज्या स.सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या निघतील ते स.सदस्य निवृत्त होतील.

मा.सभापती : 16 नावे असलेल्या स्वंतत्र चिठ्ठ्या बंद बरणीत टाकण्यात आलेल्या आहेत. आता ज्या आठ चिठ्ठया काढण्यात येतील ते आठ सदस्य स्थायी समिती सदस्य पदावरून निवृत्त होतील.

मा.सभापती यांनी बंद बरणीतुन एक-एक अशा आठ स्वतंत्र नांवे असलेल्या चिठ्ठ्या काढतील.

यावेळी मा.सभापती यांनी बंद बरणीचे झाकण उघडुन एक-एक चिठ्ठी काढली.

नगरसचिव : मा.सभापती यांनी बंद बरणीतुन काढलेल्या चिठ्ठ्यावरील नांवे पुढीलप्रमाणे आहेत.

01. जैन विकास रतनलाल
02. माळवतकर महेश शिवाजीराव
03. वाघचौरे विजय लक्ष्मणराव
04. रिक्त असलेल्या पदाची चिठ्ठी
05. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
06. अ.साजेद अ.सत्तार
07. वैद्य रेणुकादास दत्तोपंत
08. सावंत मधुकर दामोधर

नगर सचिव : एकुण 16 सदस्यांच्या बंद बरणीत चिठ्ठ्या टाकुन त्यातुन मा.सभापती यांनी 8 (आठ) स.सदस्यांच्या चिठ्ठ्या काढल्या त्यात खालील 8 (आठ) स.सदस्यांची नांवे निघाली.

01. जैन विकास रतनलाल
02. माळवतकर महेश शिवाजीराव
03. वाघचौरे विजय लक्ष्मणराव

04. रिक्त असलेल्या पदाची चिठ्ठी
05. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
06. अ.साजेद अ.सत्तार
07. वैद्य रेणुकादास दत्तोपंत
08. सावंत मधुकर दामोधर

वरील 8 (आठ) सदस्य दिनांक 01/05/2011 रोजी दुपारनंतर स्थायी समिती सदस्य पदावरून निवृत्त होत आहेत.

ठराव :

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20 (3) व 20 (4) अन्वये सभागृहात चिठ्ठ्या टाकुन (ड्रॉ पध्दतीने) स्थायी समितीचे खालीलप्रमाणे आठ (08) स.सदस्य निवृत्त झालेले आहेत. त्यास मंजुरी देण्यांत येते.

01. जैन विकास रतनलाल
02. माळवतकर महेश शिवाजीराव
03. वाघचौरे विजय लक्ष्मणराव
04. रिक्त असलेल्या पदाची चिठ्ठी
05. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
06. अ.साजेद अ.सत्तार
07. वैद्य रेणुकादास दत्तोपंत
08. सावंत मधुकर दामोधर

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती स्था.स. यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद